# मातृवेद

सविता शेट्टी

# मातृवेद

## सविता शेट्टी

ई साहित्य प्रतिष्ठान

# मातृवेद

सविता वाळिंबे-शेट्टी.

एस-1/35, जय कृष्ण सुदामा सोसा.
बांगुर नगर, गोरेगाव (प),
मुंबई-400104.
मो. 9820019448
shettysavita3@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन :१० जुलै २०२३**

©esahity Pratishthan®2023

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# सविता वाळिंबे-शेट्टी



ई-साहित्यने माझा प्रथम कथासंग्रह जननी हा ई-पुस्तकरुपाने प्रकाशित केला व वाचकांच्या प्रतिसादाने मला पुढील लेखनास प्रोत्साहन मिळाले. 'मातृत्व' ही एक भावना इतकी विस्तृत, खोल, सर्वव्यापी आहे कि आपण केवळ आपल्या आजूबाजूला नजर जरी फिरवली तरी अनेकविध रुपात ती सामोरी येते. हेच विषयसूत्र धरून मी आणखी काही कथा लिहिल्या ज्या ई-साहित्यतर्फे 'मातृवेद' या कथासंग्रहाच्या रुपाने प्रकाशित होत आहेत.

या कथा पुस्तकरुपाने वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ई-साहित्य प्रतिष्ठानने केले त्या बद्दल मी संपूर्ण ई-साहित्य टीमची अत्यंत आभारी आहे.


लहानपणापासूच वाचनाची खूप आवड. सर्वच मराठी वाचकांप्रमाणे मी पुलं चे साहित्य वाचत मोठी झाले. व.पु. काळे, विजया वाड, विजया राजाध्यक्ष, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, इंद्रायणी सावकार या सर्वांच्या लेखनातही खास रुचि आहे.

मनातल्या मनात गोष्टी गुंफण्याचा छंद लहानपणापासूनच होता, प्रत्यक्ष लिखाणास 1990च्या सुमारास सुरुवात केली. लहानमुलांच्या कथा, पुस्तके तसेच स्त्री-जीवनाविषयी कथा विविध मासिकांतून प्रकाशित झाल्या. हलक्या-फुलक्या विनोदी कथाही दिवाळी अंकांमधून प्रकाशित झाल्या.

‘मातृवेद’ या ई-पुस्तकातील कथांविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया व विचार जाणून घेण्यास मी उत्सुक आहे, जरूर कळवावे.

आपली नम्र,
सविता वाळिंबे-शेट्टी.
मो. 9820019448
shettysavita3@gmail.com

Click on the cover to open the book



# मातृवेद

या विश्वाच्या चक्राला अव्याहत सुरू ठेवणाऱ्या
सर्व मातांना हा कथासंग्रह
सादर अर्पण.

# कथानुक्रम

व्यर्थ,

तुझ्यासाठी,

कशासाठी एवढा आटापिटा

वंशपरंपरागत ठेवा.

# व्यर्थ

"ऑल द बेस्ट." सतिशच्या हातात कॅप देतांना नेत्रा पुटपुटली.

"कशासाठी?" त्याने एक भुवई उंचावली.

"तुम्ही मला सांगितलं नाही, पण आज काहीतरी ... आहे, होना?" तिने शांत स्वरात विचारले.

"अग, नाही," सतिशने जरा जास्तच मनमोकळया आवाजात बोलण्याचा प्रयत्न केला पण मग तिची संथ नजर पाहून मान हलवली, "अगं, खरंतर काही खास नाही, नेहमीचीच ड्यूटी. आल्यावर सांगतो, ठीक आहे?" तो निघून गेला नि ती निःश्वास टाकत आपल्या लहानग्या मुलाला उठवायला वळली. एका पोलीस ऑफिसरसाठी ताणतणाव काही नवीन नव्हते आणि त्याच्या पत्नीच्या रूपात नेत्रानेही ते आयुष्याचा एक हिस्सा म्हणून स्वीकारले होते. पण तरीही जेव्हा कधी सतिश आपले ताण आपल्यातच ठेवू पाहे तेव्हा ती अस्वस्थ होई. आताही जरी दिवसभर तिने स्वतःला आपल्या कामात गुंतवून ठेवले तरी मनाच्या एका कोपऱ्यात ती अस्वस्थता कुरतडत होती. शेवटी जेव्हा तिने सतिशला परतून दारात उभे पाहिले तेव्हा पोटातली ती घट्ट गाठ थोडीशी उकलली. लगेचच काही विचारायचं नाही एवढं तिला नक्कीच कळत होतं.

"नेत्रा, एवढी कसली चिंता करत होतीस?" रात्रीच्या जेवणानंतर ते दोघे जेव्हा झोपाळलेल्या सुकेतूला थोपटत जरा आरामात बसले तेव्हा सतिश म्हणाला, "माझ्या जीवाला धोका वगैरे काही नव्हता ग…"

"पण तुम्ही नक्कीच कशाबद्दल तरी अस्वस्थ/अपसेट होता, खरं ना?" ती म्हणाली.

"तू राजाचं नाव ऐकल आहेस? क्रिमिनल...गँगस्टर?" तिने मानेने होकार दिला तेव्हा तो पुढे म्हणाला, "आम्ही कित्येक वेळा त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, जाळं पसरलं, पण प्रत्येक वेळी तो निसटून गेला. तेव्हा आता काही धागा मिळतो का हे पाहण्यासाठी आम्हाला त्याच्या आईला इंटरॉगेट करण्याच्या ऑर्डर्स मिळाल्या. आज मला तिच्या घराची झडती घेऊन तिची चौकशी, तपासणी करायची होती... आणि मला ते पसंत नव्हतं, इतकंच." नेत्रासाठी हे जरा अनपेक्षित उत्तर होतं, "मग मिळाला काही मागोवा त्याचा?"

"अं? हं…मी बोललो तिच्याशी, पण तिच्याकडून काय मिळणार, मला तशी अपेक्षाही नव्हती. आपण मुलाच्या कुकर्मांसाठी एका आईला कसं जबाबदार धरू शकतो? आणि एक आई आपल्या मुलाच्या अश्या गोष्टी सांगेल अशी अपेक्षा कशी करू शकतो? मुलाला पकडण्यासाठी आईला असं कोंडीत धरणं हेच मला अजिबात पटत नाही." त्याने विषण्णपणे आपली मान हलविली, "अरे, त्याच्या साथीदारांना पकडायला सांगा, मित्रमंडळींना धरायला सांगा, ते आम्ही चोख करू. केलंही, पण फारसं काही नाही मिळालं. पण आईकडून आम्ही काय मिळवू शकणार? तूच सांग, तू देशील तुझ्या सुकेतूचा ठावठिकाणा पोलीसांना?"

“काय?” या त्याच्या अचानक प्रश्नाने आणि त्यातील गर्भितार्थाने नेत्रा जरा दचकली, आणि नकळत तिची बोटे झोपलेल्या मुलाच्या हाताभोवती घट्ट वळली. “पाहिलसं? कळलं मला काय म्हणायचय ते?” तो म्हणाला.

“मग, तिने काय सांगितलं तुम्हाला?” नेत्राने घाईघाईने संभाषणाचा रोख आपल्या मुलापासून दूर वळवण्याचा प्रयत्न केला. “काही नाही. आम्ही घराची झडती घेतली, तिला राजाच्या नवीन ठिकाणांबद्दल विचारलं. तिला काहीच माहीत नव्हतं, निदान ती तसं म्हणाली.”

“या झडतीने तो गँगस्टर सावध होईल आता.”

“मला नाही वाटत. या रेडमधून काही निष्पन्न निघालं नाही, आमच्या हाती काहीच सुगावा लागला नाही, तेव्हा तो उगाचच अतिसावध वगैरे काही होणार नाही.”

“मग आता पुढची स्टेप काय घेणार तुम्ही?”

“पहायचं, काही नक्की नाही अजून तरी,” मग आपल्याच विचारात असल्यासारखा बोलला, “त्याला आईची खूप माया आहे, खूप अटॅच्ड आहे तो तिला, त्यामुळे दिवसेंदिवस लपून राहिला तरी अधूनमधून तिला भेटण्याचा प्रयत्न करतोच. घरावर पाळत आहे त्यामुळे तिथे काही तो येणार नाही, ती बाईही फारशी कुठे बाहेर जात नाही. कधीकधी प्रार्थनामंदिरात जाते, त्यामुळे आमचा अंदाज आहे की बहुधा तो नियोजित वेळी वेष पालटून तिथे येत असावा....”

“म्हणजे तुमची पुढची ॲक्शन त्या प्रार्थनास्थळी असणार तर...” “काही नक्की नाही. मला स्वतःला ते आवडत नाही. एकतर, अश्या जागी काही ॲक्शन

घेणं म्हणजे नाजूक इश्श्यूज् गुंतले असतात. आणि मुलाला पकडण्यासाठी आईला वापरणं हे अगदी नाईलाज झाल्याखेरीज मी करू इच्छित नाही....एवीतेवी आत्ता लगेच तर काही करणार नाही, या रेडमुळे दोघेही माय-लेक सावध झाले असणार...”

राजाच्या गुन्हेगारी कारवाया चालूच राहिल्या, त्याच्या गुंडांचा किडनॅपिंग, एक्सट्रर्शनच्या गुन्ह्यांमध्ये हात असल्याच्या बातम्या मिळत होत्या. त्यामुळे पोलीस फोर्सवर सर्व बाजूंनी दबाव वाढत होता. पोलिसांनी त्याच्या आईवर दुरून नजर ठेवलीच होती, पण काहीच हालचाल दिसत नव्हती. कदाचित आपल्या आईच्या जीवाला धोका होईल या शंकेने त्याने आईला भेटणे तात्पुरते बंद केले असावे असे पोलीसांना वाटले. त्याआधीही त्याला स्वतः पकडले जाण्याची भीती होती, त्यात आईलाही जोखीम होती, पण यामुळे आईला भेटणे त्याने कधीच थांबवले नव्हते. तेव्हा अजूनही कदाचित येत असावा, पण वेशांतर करून.

पोलीसांसाठी राजा हा काही एकच क्रिमिनल नव्हता.विविध गुन्ह्यांचा पाठपुरावा करणे चालूच राहिले, आणि त्यात न मिळणा ऱ्या राजाची केस जरा मागे राहिली. तरीही नेत्राला पुन्हा एकदा सतिशमध्ये तसंच टेन्शन जाणवलं. “तुम्ही जर का तुमचे तणाव बोलून दाखवलेत तर जरा हलकं वाटू शकेल.” तिने सुचवून पाहिले.

“काही नाही, तीच पुन्हा राजाची कथा.” सतिश निःश्वास टाकत म्हणाला, “ही सीम्स टू लीड अ चार्म्ड लाइफ. आम्ही जंग जंग पछाडले, पण तरीही तो तिथे मोकळा फिरतोय. जनता सरकाच्या पाठी लागलीये आणि वरचे बॉसेस आमच्यावर उखडताहेत. काहीच नाही तर त्याच्या आईमार्फत त्याला पकडा अश्या आम्हाला आतून ऑर्डर्स आल्यात. तेव्हा असं दिसतंय की शेवटी आम्हाला ते करावेच लागणार....”

“मग आता कसं करणार तुम्ही लोकं.... तिला ताब्यात घेणार का लपून पाठलाग करणार?” नेत्राने विचारले.

“काही पक्का प्लान अजून बनला नाही,” तो म्हणाला, “पण एक गोष्ट नक्की, त्या बाईला कुठल्याही गोष्टीचा सुगावा लागू न देता प्लॅन बनवावा लागेल. तिला जरी जराशीही शंका आली तरी ती लगेच त्याला येन केन प्रकारे सावध करेल एवढं नक्की. तेव्हा खूप खूप काळजीपूर्वक पावलं उचलावी लागणार… तिच्याकडून वा त्याच्या खबऱ्यांकडून राजाला जरा जरी वास लागला की आम्ही आसपास आहोत, तर तो येणारच नाही....”

एकूण असं दिसत होतं की आतील चक्र आता जरा वेगाने फिरू लागली होती. आपल्या नवऱ्याच्या विचारमग्न गंभीर चेहऱ्यावरून तिला अंदाज आला होता, पण त्याला प्रत्येक गोष्ट विचारून डिस्टर्ब करत राहणे बरोबर नाही हे जाणून ती गप्प होती. सतिशला योग्य वाटेल तेव्हा तो सांगेलच याची तिला खात्री होती.

“आजच आहे ॲक्शनचा दिवस.” घरातून निघतांना सतिश शांत स्वरात म्हणाला. तसं नेत्राने अगोदरच ताडलं होतं, पण त्याच्यामधील ताण जाणवून ती काहीच बोलली नव्हती, पण तिने सारे शब्द तिच्या डोळांतून प्रकट होत होते. आपले हजार प्रश्न मनातच ठेऊन नेत्राने त्याला निरोप दिला.

तो दिवस लांब खेचतच राहिला आणि घड्याळाचे काटेही इतके हळूहळू हलत होते…सतिशची गुन्हेगारांना पकडण्याची ही काही पहिलीच खेप नव्हती, तिने आपल्या मनाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण अर्थात राजाच्या तुलनेत ते सारे लिंबूटिंबू होते. काहीही बिनसलं की आधी गन चालविण्याची राजाची खोड प्रख्यात

होती. विचारांत गोंधळून आत-बाहेर करतांना तिचं तिलाच भान नव्हतं की ती काय करत होती.

त्या तिच्या गोंधळलेल्या अवस्थेतही जेव्हा केव्हा तिची नजर लहान सुकेतूवर थबकायची तेव्हा सतिशबरोबरच्या आधीच्या संभाषणाच्या आठवणीने तिच्या हृदयाचा एक ठोका चुकायचा. आपल्या मुलाबाबत कोणताही असा निर्णय घ्यायची वेळ कोणत्याही आईवर येऊ नये, कोणत्याही आईला अश्या अवघड कोंडीत पकडलं जाऊ नये, विचारानेच तिच्या अंगावर शहारा आला.

रोजची कामं सोडून नेत्रा टीव्हीपुढेच घुटमळत होती, सतरा चॅनल्स बदलून स्थानिक बातम्या कुठे मिळतात का हे पाहात होती. कुठेच काही मिळेना तेव्हा तिने अगदी रेडिओही लावून पाहिला. पण कुठेही काही धरपकडीची बातमी मिळाली नाही. काय झालं असावं? काही गंभीर गडबडघोटाळा तर नाही ना? तिच्या पोटात गोळा आला.

शेवटी संध्याकाळच्या साताच्या बातम्यांमध्ये थोडक्यात सांगितलं की पोलीसांच्या एन्काउन्टरमध्ये कुख्यात गुन्हेगार राजा मारला गेला होता आणि त्यात काही पोलीस कर्माचारीही जखमी झाले होते. नेत्राची बोटे रिमोटवरच गोठली, पण पुढे काहीच सांगितले गेले नाही. काय झालं होतं? सतिश....? तिचं सारं शरीर ताठरलं. पण टीव्हीच्या बातम्या संपल्या होत्या. ती तशीच टीव्ही स्क्रीनकडे पाहात राहिली.

तिचं मन बधीर झालं होतं नि शरीर गोठल्यागत.... काहीच सुचत नव्हतं. तिची नजर फोनकडे वळली. तिने नंबरची बटणं दाबली, कुठला नंबर, कोणाचा फोन फिरवला तिला काहीच कळत नव्हतं. “नाही वहिनी, सतिश अगदी ठीक आहे,

काहीसुध्दा झालं नाहीये त्याला. पण त्याला घरी परतायला बराच उशीर होईल, समजतयं ना तुम्हाला?" नेत्राला एक धड सुसंगत प्रश्नही विचारल्याचं आठवत नव्हतं पण त्या उत्तराने तिच्या मनावरचं मणाचं ओझं उतरलं होतं. ती दाटल्या गळयाने दिवाबत्ती करायला वळली.

शेवटी सतिश जेव्हा रात्री परतला तेव्हा तो अगदी दमलेला, गळून गेल्यासारखा दिसत होता. तिने काही न बोलता त्यांला थंड पाणी प्यायला दिलं नि त्याच्या अंघोळीचं पाणी काढलं. नंतर त्याच्या आवडीचं अगदी हलकं साधं जेवणं वाढल.

आज तो किती मानसिक आणि शारिरीक थकव्यातून गेला असावा याची जाणीव ठेवून नेत्राने काहीच विचारले नाही. पण तिच्या हे नक्कीच लक्षात आलं की काहीतरी गडबड होती. त्याचा थकवा समजण्यासारखा होता, पण हे असं मौन... मिशन फत्ते झाल्याची खुशी कुठेच दिसत नव्हती. एका क्रिमनलसाठी वाईट वाटून घेण्याइतका भावूक तो नक्कीच नव्हता. मग का इतका गंभीर नि विचारमग्न होता…?

"तुमचे सहकारी जखमी झाले...सिरियस आहेत का?" त्याला चिंता वाटू शकेल अशी ही एकच गोष्ट तिला सुचली. "नाही..." जेवणानंतर हात पुसत तो म्हणाला, "दोघा-तिघांना बुलेट्स नुसत्या चाटून गेल्या. फक्त कॉंस्टेबल सितारामच्या दंडात बुलेट घुसली…पण तरी खास काही गंभीर नाही...."

एक दीर्घ उसासा टाकत तो खुर्चीत बसला, "उगाचच, अगदी हकनाक एक जीवन वाया गेलं…मला कळत नाही अजून काय म्हणावं याला…" थोडं थांबून त्याने सांगायला सुरुवात केली, "आम्ही सगळे साध्या कपड्यात, आणि राजाच्या आईचा पाठलाग करण्यात अगदी पूर्ण काळजी घेतली. आधी त्या बाईला काही

कल्पना नव्हती, आम्ही सगळेच तिच्या दृष्टीपथाबाहेर होतो. तरीही प्रार्थनामंदिरापर्यंत पोचेतोवर तिला काही शंका आली. माहीतीये, तिने काहीच खास केले नाही, पण तिच्या देहबोलीतील अगदी बारीक फरकांतून आम्हाला कळलं की ती सावध झाली आहे. चिंतित होऊन ती बाहेर पायऱ्यांवरच बसली, इथे तिथे पाहात काही उपाय मिळतो का ते शोधत राहिली…”

“आम्हाला राजाच्या येण्याची नक्की वेळ ठाऊक नव्हती, बहुधा वेळ जवळ येत होती, कारण ती एकदम उठली, निसटून घरी पळायच्या तयारीत. आम्हा सर्वांच्या मनात, एकाच वेळी एकच निर्णय चमकला नि आम्ही सर्व बाजूंनी वेढा घट्ट करत आणला. या प्लानवर इतकी मेहनत घेतल्यानंतर आम्ही असंच जाऊ देणं शक्य नव्हतं. आणि या अश्या प्रसंगानंतर तो …किंवा त्याची आईही, पुन्हा कधीच आमच्या हाती आले नसते.”

थोडं पाणी पिऊन तो पुढे बोलला, “आमचा प्लान तसा साधाच होता, तो आईला भेटायला येताच सर्व बाजूंनी कोंडी करून त्याला अटक करायची. यासाठी प्रार्थनामंदिरासारखी जागा वापरायची हे काही बरोबर नव्हतं, पण ते टाळता येण्यासारखं नव्हतं….सगळी खबरदारी घेतल्यानंतरही, ती बाई निसटू पाहात होती, तेव्हा निदान राजा येईपर्यंत तरी तिला तिथेच ठेवणे जरूरी होते. त्यामुळे आम्ही तिला घेराव घातला आणि आत चालत राहायला सांगितले…”

सतिशचे डोळे कुठेतरी शून्यात हरवल्यासारखे झाले,जणू तो त्या तणावपूर्ण नाट्याचा प्रत्येक क्षण पुन्हा जगत होता. मांडीवरच्या मुलाला थोपटणारा नेत्राचा हात तिच्या नकळत थबकला.

“अचानक ती वृध्दा ताठरली, तिने बहुधा प्रार्थनामंदिराबाहेरचा हॉर्न ऐकला असावा. आमच्याही लक्षात आले की तो आला होता, नि कोणत्याही क्षणी तिथे आत येऊ शकत होता. पुढे काय होणार याच्या तयारीत आम्ही सगळे टेन्स झालो, नि आता आमचे लक्ष आमच्या पाठीकडे जास्त होते.”

सतिशने एक आवंढा गिळला, “आणि काही पूर्वसूचनेशिवाय, अचानक त्या वृध्द बाईने आपल्या वस्त्रांतून एक छोटे पिस्तूल काढले, नि आम्हाला कोणालाही कळायच्या आतच स्वतःवरच दोनदा झाडले...”

“अग आई ग! देवा रे! हे... असं का केलं तिने?” नेत्रा त्या धक्क्याने कळवळली.

“आम्ही ही चांगलेच गोंधळलो,” सतीश कुठेतरी हरवल्यासारखा बोलत राहिला, “अर्थात राजाला सतर्क करण्यासाठीच…पण ती हवेतही झाडू शकली असती. आम्ही तिच्याकडे धावलो, तिच्या शेवटच्या श्वासाबरोबर तिने खुलासा दिला—प्रार्थनामंदिराच्या पवित्र वातावरणात ती गोळया झाडू इच्छित नव्हती, ना कोणा निष्पाप व्यक्तीवर, म्हणून स्वतःवरच……”

“मग? राजा?” नेत्राने विचारले.

“तो गाडीतून उतरतच होता, तेव्हा गोळयांचा आवाज ऐकून त्याच्यावरच पोलीस गोळया झाडताहेत असं समजून लगेच तसाच गाडीतून पसार झाला, बाहेर असलेली आमची बॅकअप टीम काही हालचाल करायच्या आतच… वाटेत त्याच्या खबऱ्याने त्याला आईच्या मृत्यूबद्दल कळवले तर तसाच पाठी फिरून सुसाट परतला. तोवर आमची बॅकअप टीम तो पळाल्याचं सांगत आत आली होती नि

आमच्या सर्वांचं लक्ष त्या स्त्रीवरच होतं. राजा समजला पोलीसांनीच त्याच्या आईला शूट केलं, तो आत आला तोच पिसाटल्यासारखा अंधाधुंद एके-47 चालवत... आमचे लोक जखमी होऊ लागले, तेव्हा आम्हालाही गोळ्या चालवाव्याच लागल्या..."

बराच वेळ दोघंही गप्प राहिले, मग एक खोल उसासा सोडून सतिश बोलला, "त्याचं दुःख नाहीये, पण ती स्त्री...तिच्या त्यागाने काय हासिल झालं? एक जीव गेला…व्यर्थच...."

नेत्राच्या अंगावर काटा उभा राहिला, तिने आपल्या झोपलेल्या बाळाला जवळ कुशीत ओढलं… का ते तिलाही कळलं नाही…

# तुझ्यासाठी...

संध्या लेकीच्या विस्फारलेल्या टपोऱ्या डोळयात पहात राहिली, धक्का तर नक्कीच बसला होता, पण त्या केविलवाण्या झालेल्या डोळयात आसू जमायला लागताच संध्याने घाईघाईने शकुनचे हात आपल्या हाती घेतले, “धक्का बसणं तर स्वाभाविक आहे सोनू, पण आता याबद्दल काही विचार करायचा नाही बरं. तू आमचीच आहेस, नेहमीच होतीस आणि नेहमीच राहणार आहेस...नुकताच तुझा एकविसावा वाढदिवस झाला, म्हणून तुला सांगायचं ठरवलं, तसं आधीपासूनच ठरवलं होतं कि तू सात-आठ वर्षांची झालीस की सांगावं तुला, पण मग थांबले, एवढ्या लहान वयात...”

“आणि…तेव्हाच सांगितलं असतस तर मग मी…मला तेव्हाचे ….इतरांच्या वागण्याचे अर्थही कळले असते, म्हणून नाही सांगितलंस, हो ना?” शकुनने शांत स्वरात पण अगदी स्पष्ट प्रश्न विचारला. संध्या जरा गोरीमोरी झाली पण लगेच सावरुन म्हणाली, “अगं, कुणी कधी बोलतं ते तू असं मनात धरुन बसू नकोस...आणि आता त्याला असे अर्थही चिकटवू नकोस. आधी मी सांगितलेलंच सर्व विसरून जा बघू…”

“तू म्हणतेस विसरून जा, तर ठीक आहे,” ते शक्य नाही याची संध्याला जाणीव करून देत शकुन म्हणाली, “पण एक विचारायचं होतं…जरा कळू लागल्यावर मला थोडं गोंधळायला व्हायचं कि माझ्यात आणि जयमध्ये इतकं कमी

अंतर कसं? जेमतेम वर्षा सव्वा वर्षाचं…? मला या...घरात आणलं तेव्हा मी …केवढी होते?”

संध्याने जरा अस्वस्थ चुळबुळ केली, तिला जास्त खोलात जाऊन कुठल्याही प्रश्नाचं उत्तर द्यायचं नव्हतं, पण त्याच बरोबर ती आपल्या या लेकीला चांगलं ओळखत होती, उत्तर मिळवल्याशिवाय गप्प राहिली नसती. “तू असशील नऊ-दहा महिन्यांची… नवीन वर्षांबरोबरच आलीस तू या घरात…”

“आणि श्रीजय 2 मेचा…” शकुन मनात गणित मांडत म्हणाली, म्हणजे तू मला जेव्हा या घरात आणलस तेव्हा तुला माहीत होतं की तू…तू आई होणार आहेस. पाच महिने प्रेग्नंट होतीस...”

“हो, होते गरोदर, मग?” ती हे का विचारते आहे ते कळूनही न कळल्यासारखं दाखवत संध्याने विचारले.

“मग जर तुला स्वतःचं मूल होणार होतं,” एकएक शब्दावर थांबून जोर देत शकुन बोलली, “मग तू मला अनाथाश्रमातून मुळात दत्तक घेतलसच का?” उत्तर देणं क्रमप्राप्तच होतं.

“हे बघ, लग्नानंतर चौदा वर्षे मुलबाळं झालं नाही तेव्हा आम्ही आशाच सोडून दिली होती, घरगुती—वैद्यकिय सारे उपचार झाले, देव-देव नवस सारं काही केलं… .” दूर भूतकाळात पहात संध्या बोलली, “मग दत्तक घ्यायचं असं ठरवून सर्व कारवाई सुरू केली, तेव्हाच सगळ्या मुलांतून तुला निवडलंही…पण सगळे पेपरवर्क होईपर्यंत, सरकारी अनुमती मिळेपर्यंत वेळ लागतोच ना, त्याच अवधित... देवाची लीला पाहा, आणि मुख्य म्हणजे तुझा पायगुण. मी काही अंधश्रध्दांवर

विश्वास ठेवत नाही, पण यावेळी मात्र ठेवावासा वाटला. तुला घरी आणायचं ठरवलं आणि तेव्हाच लक्षात आलं कि मला दिवस गेले होते...”

“पण आणायचं नुसतं ठरवलं होतं ना आई, आणली तर नव्हती ना मला घरात,” शकुन शब्द मोजून बोलत होती, “मग स्वतःच्या बाळाची चाहुल लागताच दत्तक घेण्याची सारी प्रक्रियाच बंद करू शकली असतीस. मला घरी आणण्याची गरजच राहिली नव्हती, तर...”

“असं कसं सोने,” शकुन नको तेवढ्या खोलात जात होती आणि त्याने संध्या बेचैन होत होती, “एकदा ठरलं ते ठरलं, म्हणून आम्ही... आम्हाला हवीच होतीस तू...”

शकुन टोकदार नजरेने तिच्याकडे बघत राहिली. संध्या खोटं...किंवा अर्धसत्य सांगत होती आणि शकुन तिला जाणवून देत होती कि तिला ते माहीत होतं. संध्या दत्तकाबद्दलची प्रत्येक गोष्ट आम्ही, आम्हाला असं म्हणून सर्व कुटुंबियांना समवेत घेत होती. मात्र शकुन कटाक्षाने ‘तु मला का आणलंस?’ हे तिला एकटीलाच उद्देशून विचारत होती. संध्याने कितीही आव आणला तरी शकुन स्वतःच्या जन्माच्या रहस्याबरोबरच घरातल्या एकूण परिस्थितींचं कारण जाणून चुकली होती. आईशी तरी निदान ती स्पष्ट बोलू इच्छित होती.

“घरात सर्वांचाच विरोध असतांनाही, तू—केवळ आधी तुम्ही सर्वांनीच तसं ठरवलं होतं म्हणून, हट्टाने मला घेऊन आलीस,” आईकडे रोखून पहात ती हळू आवाजात बोलली, “फक्त घेऊनच आली नाहीस तर जयइतकंच प्रेम, माया, आणि त्याहूनही महत्त्वाचं, त्याच्याइतकंच मलाही या घरात स्थान दिलस---सर्वांशीच झगडून, होय ना?”

"नाही, तसं अजिबात नव्हतं सोनू," संध्या तिला पटवायला धडपडू लागली, "मीच एकटी नाही ग, घरातल्या सर्वांनाच तू हवी होतीस, जय जन्मायचा होता तरीही मला कोणाशीही झगडावं नाही लागलं तुझ्यासाठी, पपा, आजी सगळ्यांनाच तू हवी होतीस…हवी आहेस. तू पायगुणाची म्हणून तर सगळ्यांनी कौतुकाने तुझं नाव शकुन ठेवलं…" तिच्याकडे पहात शकुन किंचितसं हसली आणि मान हलवत उठून आपल्या खोलीत गेली.

सुस्कारा टाकत संध्या ती गेली त्या दिशेला पहात राहिली. मुलं लहानपणच्या आठवणी पुढे पार विसरून जातात हे तिला कधी फारसं पटलच नव्हतं, आणि आता शकुनने ते सिध्द केलं होतं कि चांगल्या वाईट, विशेषतः वाईट गोष्टी बरोबर आठवणीत राहतात, म्हणूनच तिने संध्याचं म्हणणं मानायला नकार दिला होता.

खरं होतं ते…घरच्या सर्वांनीच, तिने, सुधाकरने आणि सासूबाईंनी मिळूनच दत्तकाचं ठरवलं होतं, प्रथम एक मुलगी, मग मुलगा दत्तक घ्यावा असा विचार केला. निवड करतांना त्यांना हवे तसे अगदी नवजात बालक तिथे नव्हते, तेव्हा चार-पाच महिन्यांच्या शकुनची निवड केली. त्यानंतर ती प्रत्यक्षात घरी यायला जो उशीर झाला तो संध्याच्या सांगण्याप्रमाणे केवळ ऑफिशियल कारवायांमुळे झाला असं नाही.

शकुनने बरोबर ताडले होते…तिला दत्तक घ्यायचे नक्की केल्यानंतर तीन-चार महिन्यांतच जेव्हा संध्याच्या प्रेग्नंसीची खात्री पटली, तेव्हा त्या सा‍ऱ्यांचा आनंद गगनात मावेना. त्या खुशीत आणि गडबडीतही संध्या शकुनला विसरली नव्हती, मात्र सुधाकर आणि त्याची आई ऐकून घ्यायला तयारच नव्हते. 'आता गरजच

काय? जेव्हा आपलं स्वतःच बाळ, या घराचा रक्ताचा वंशज जन्माला येणार आहे, तर बाहेरच्या अनाथ मुलीला आणायचेच कशाला?' असे म्हणत सासुबाईंनी साफ धुडकावून लावले होते. संध्याला ते पटले नव्हते, एकदा आपण ठरवलं तर...

"अगं तू तरी काय फिल्मी गोष्टी करतेस," सुधाकरने थट्टा केली होती, "तिला काय वचन वगैरे दिलयं कि काय? तो एवढासा जीव, तिला माहितही नाही. हवं तर अनाथाश्रमाला आपण मोठी देणगी देऊ." त्याने विषय संपवला.

"जर आपण तिला घरी आणल्यानंतर मी गरोदर राहिले असते तर आपण काय तिला परत धाडणार होतो का? तिला निवडली तेव्हाच माझ्यासाठी ती माझी मुलगी झाली..." असं म्हणत संध्याने हट्टाने तिला घरी आणले होते. सासुबाईंचं संध्याशी व्यवस्थित पटायचं, तसा काही प्रॉब्लेम नव्हता, पण या बाबतीत मात्र.... त्या आधीच हात झटकून मोकळ्या झाल्या. "ती एवढी लहान, तुझे दिवस भरले कि बाळंतपणात कोण सांभाळणार तिला? मी अजिबात बघणार नाही हो, आधीच सांगून ठेवते..."

बाळंतपणासाठी माहेरी असतांना आई शकुनला सांभाळायची, पण मागाहून दोन लहान मुलांना मोठं करतांना संध्याची पार तारांबळ उडत होती, जवळजवळ जुळयांना वाढवण्यासारखं होत होतं. श्रीजयच्या बाबतीत सुधाकर, सासुबाई मदत करायचे, पण शकुन पूर्णपणे एकट्या संध्याचीच जबाबदारी. शकुनचा खर्चही नेहमी पाठी टाकला जाई, किंवा कपाळावर आठ्या पडत. वडिलांनी तिच्या नावावर ठेवलेल्या स्त्रीधनातून संध्या निभावून नेई.

शकुन जसजशी मोठी होऊ लागली, तिला वागण्या-वागण्यातील फरक कळू लागला. पुढे पुढे तर तिला आजीच्या तोंडचे बरेच फटकारेही पडू लागले.

हिरमुसली होऊन आपल्या बालमनाला जमतील तसे शकुन निष्कर्ष काढू लागली. 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हणून सगळ्यांना जय हवा, मी मुलगी म्हणून पपा-आजीला मी नको…'

संध्या तिला आंजारुन गोंजारून समजूत काढायचा प्रयत्न करी. "अगं तू तर या घरची लक्ष्मी, तुझ्या पावलांनी सुबत्ता आली घरात…" ते खरंही होतं. शकुनला घरी आणली तेव्हाच सुधाकरच्या कन्स्ट्रक्शनच्या धंद्यात इतकी बरकत आली कि ते सर्व त्याच्याच बांधलेल्या इमारतीत मोठ्या घरात राहायला गेले. संध्याला हायसं वाटलं होतं कारण जुन्या शेजाऱ्यांना शकुन दत्तक-कन्या असल्याचं माहीत होतं, कधी चुकुन कुणी तिच्यापुढ्यात बोलले तर…? नवीन घरात सर्व शकुनला तिचीच मुलगी समजत...

इतर कुणाकडून तिला समजण्यापेक्षा आपणच समजावून सांगावे असे संध्याने ठरवले, पण सासुबाईंचे ताशेरे ऐकून तिने विचार बदलला. मुलीला सत्य समजलं तर आपला तिरस्कार का होतो ते कळून त्या कोवळ्या मनावर ओरखडे उठतील या भीतीने तिने वाट बघायचे ठरवले.

संध्याने हौशीने शकुनला जयबरोबर कराटे क्लासला घतले, गाण्याच्या, भरतनाट्यमच्या क्लासेसना ही पाठवले. तिला सर्वांत जास्त आवड होती ती भरतनाट्यमची, ना कधी क्लास चुकवायची ना प्रॅक्टीस. पण त्याने ही आजीचा मस्तकशूळ उठे, 'झाला का हिचा थयथयाट सुरू...' 'जिथली उपज तिथले गुण दाखवणारच ना…' शकुनच्या कानावर या गोष्टी पडू नये याची संध्या परोपरीने काळजी घेई.

आताही तिची विचारसाखळी तुटली ती सासुबाईंच्या तश्याच शब्दांनी, “बाई बाई काय हा दणदणाट, घर हादरतंय नुसतं...” संध्या भानावर आली. शकुनच्या खोलीतून आवाज येत होते—ना घुंगरू बांधले होते ना पार्श्वसंगीताचा आवाज मोठा होता, पण पदन्यासच इतका दमदार होता. पोरगी आपल्या मनातली खळबळ आपल्या नृत्यातून व्यक्त करत होती.

आणि मग हे नेहमीचच झालं. शकुनचं बोलणं बरचं कमी झालं, पण शरीर पार थकून जाईल इतका नृत्याचा सातत्याने रियाझ करत राहिली जो दिवसेंदिवस वाढतच जाऊ लागला. तिचं मर्यादेबाहेर स्वतःला दमवून घेणं पाहून संध्या तिला वारंवार समजावायला जाई, पण शकुन ताडकन् बोले, ‘आजीला माझा त्रास होत असेल ना…?’ तिला कसं समजावावं हे संध्याला समजेना. शकुनची वाढती घुसमट तिला जाणवत होती.

कधी शांत असतांना संध्याची काळजी पाहून शकुन तिला सांगे, ‘अगं, शास्त्रीय नृत्याची आंतरकॉलेजीय मोठी स्पर्धा आहे, त्यासाठी प्रॅक्टीसही तितकीच तयारीची हवी ना…’ पण शकुनने कारण समजावले तरी संध्याला तिच्यातील वाढत जाणारा तो विचित्र ताण जाणवत होता आणि तिची चिंता त्याने कमी होतं नव्हती.

शकुनच्या मनाची अवघड स्थिती संध्याला दिसत होती. पूर्वी पपांचं, आजीचं वागणं आवडलं नाही तर ती कधी मनातले विचार बोलून दाखवायची, कधी त्यांच्याशी वाद घालायची, ‘असं का?’ हे त्यांना विचारायची. पण आता तिला घरच्यांच्या उपकाराखाली दबल्यासारखं झालं होतं. त्यांचं वागणं बोलणं आवडलं नाही तरी सहन करायला हवं हा जबरदस्तीचा नाईलाज तिचं मन कुरतडत होता. तिचं आतून कोमेजत जाणं संध्याला दिसत होतं, अस्वस्थ करत होतं. आजी-पपांची

पूर्वीची प्रत्येक गोष्ट आठवून ती आताच्या नव्या जाणीवेच्या प्रकाशात अजूनही दुःसह होत होती आणि मग मनातील उद्वेगाला वाट करून देण्यासाठी पुन्हा शरीर तुटेपर्यंत प्रॅक्टीस. आजी तर येता-जाता म्हणत, ‘काय भूत संचारलंय हिच्यात…?’ संध्या एक सुस्कारा टाकून गप्प राही.

स्पर्धेत मात्र पोरीने नाव काढलं. इतक्या असंख्य निष्णात स्पर्धकांमधून केवळ ट्रॉफीच जिंकली नाही, तर प्रेक्षक, परीक्षक, इतर मोठमोठे कलाकार सर्वांची खूप वाहवा देखील मिळवली. मुख्य परीक्षक, प्रसिध्द नृत्यांगना सुमेधादेवी तर इतक्या प्रभावित झाल्या की त्यांनी तिला खास भेटीसाठी बोलावले आणि आस्थेने तिची विचारपूस केली. भविष्यासाठी तिच्या काय योजना आहेत ते विचारले.

सुमेधादेवी कायमस्वरूपी अमेरिकेत स्थायिक झाल्या होत्या, तिथूनच विविध देशांमध्ये नृत्याच्या कार्यक्रमांसाठी दौरे करत, आणि सध्या दक्षिण आशियाच्या दौऱ्यावर आल्या होत्या. त्यांनी त्यांची इच्छा शकुनला बोलून दाखविली, दोन तीन महिन्यांनंतर दौऱ्यावरून परततांना जर शकुन नेहमीसाठीच देशांतर करून त्यांच्यासोबत त्यांची शिष्या म्हणून राहिली आणि पुढे त्यांच्या नृत्याची वारसदार झाली तर त्यांना ते खूप आवडेल. हे सगळं इतकं अचानक होतं की बावचळलेल्या शकुनला त्यांनी विचार करायला हवा तितका वेळ घे, दोन तीन महिन्यांनी ठरवलंस तरी चालेल असे समजावले.

शकुनला फारसा विचार करायला नाही लागला. तिने आपली डिग्रीची शेवटची परीक्षा पूर्ण करण्याआधीच जाण्यासाठी लागणारे कागदपत्र आणि इतर तयारी सुरू केली. संध्या हतबल होऊन फक्त पहातच राहिली. शकुन शोधक नजरेने तिच्याकडे बघे, संध्याला ठाऊक होतं, ती नाही म्हणाल्यास शकुन जाणारही नाही.

तिला नाही म्हणावसं वाटे, भय वाटे…पोरगी एकटी इतक्या दूर देशात...? पण तिला हे ही दिसत होतं की शकुनचा जीव इथे गुदमरत होता, इथून बाहेर पडण्यासाठी धडपडत होता. काळजावर दगड ठेऊन संध्याने लेकीला जाण्याचा मार्ग मुक्त करून दिला.

शकुन तशी आधीच दुरावल्यासारखी झाली होती, आता तर परदेशीच निघून गेली....यशामागून यश संपादन करत राहिली. सुमेधादेवींनी तिला सर्वपरीने प्रोत्साहन दिले, तिथे शकुनने पुढील शिक्षण घेतले, अभिनयाचेही धडे घेतले. हॉलीवूडची अगदी अतिप्रसिध्द तारका नाही तरी बऱ्यापैकी नाव मिळवले. पण या सर्वांबरोबरच सुमेधादेवींना दिलेला शब्द पाळून त्यांचा नृत्याचा वारसा कसोशीने पुढे चालवत राहिली.

दुरूनच लेकीचं यश पाहून संध्याला भरून येई. शकुन कधी फोन करे, पण नात्यात आता एक अवघडलेपणा आला होता, आणि संध्या तिला दोष देऊ शकत नव्हती. आजींचे शेरे काही संपत नव्हते… 'तिथल्या सिनेमावाल्यांसारखं वागून आपल्या घराण्याच्या नावाला काळिमा फासला नाही म्हणजे मिळवली…' संध्याने त्यावर विषण्णपणे स्पष्टीकरण दिले, 'ती आता नाव फक्त शकुन लावते, घराण्याचं नाव नाही…' आजींचे ताडकन् उत्तर, 'आता कशाला घराची आठवण ठेवेल? किती कृतघ्न असावं...बाई बाई...' फक्त त्याच एक असं दोन्हीकडून बोलू जाणेत, संध्याने उसासा टाकला.

जयही उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस गेला, पण दोघांची शहरे दूर-दूर त्यामुळे भेटीगाठी नव्हत्या. दोन्ही मुलांच्या फोनची वाट पहात संध्या नित्यक्रम उरकत राही. सगळं ठीकच चाललं होतं.

पण सर्व घडीच विस्कटून गेली. सुधाकरच्या कंपनीची बांधुन पूर्ण झालेली मोठी उंचच्याउंच इमारत कोसळली. कोणी राहायला गेले नव्हते त्यामुळे सुदैवाने जीवित हानी झाली नाही, पण प्रचंड आर्थिक नुकसान झाले, इतक्या वर्षांचे कमावलेले नाव मातीमोल झाले आणि सुधाकरवर मोठी कोर्टकेस लावण्यात आली. वयोमानाप्रमाणे त्याच्या रक्तदाबाच्या वगैरे तक्रारी सुरू झाल्याच होत्या त्या खूप बळावल्या. तब्येत ठीक राहात नव्हती पण आईला, बायकोला चिंता वाटू नये, आणि पैसे खर्च होऊ नये म्हणून दुर्लक्ष करत राहिला. पैशांची तंगी जाणवत होती. आजीही आपल्या वृध्दपकाळाच्या शारीरिक तक्रारींबद्दल तोंड दाबून गप्प राहू लागल्या.

मुलांना अजिबात कळवलं नाही. पण जयला मित्रांकडून समजताच तो शिक्षण सोडून यायला तयार झाला, त्याला कसंबसं समजावलं की आर्थिक किंवा शारीरिक परिस्थिती तशी काही काळजी करण्यासारखी नाहीये, तेव्हा त्याने शिक्षण पूर्ण करावे. चिंतेच्या वातावरणातच ते तिघे आला दिवस काढत होते.

मग एक दिवस अचानक शकुन दारात उभी. कुणाच्या ध्यानी ना मनी, सगळेच आपल्या विवंचनेत. संध्याने धाऊन तिला जवळ ओढलं. शकुनने रीतसर वाकून तिला आणि पपांना नमस्कार केला. पण ती पूर्वीची अवखळ, लाघवी सोनू राहिली नव्हती. पपांकडे वळत एकदम कामाचं बोलावं तशी म्हणाली, “ते…कर्वे वकील कसे आहेत?....म्हणजे तुमच्या केसच्या दृष्टीने?”

“कर्वे? ते तर या क्षेत्रातलं सर्वात मोठं नाव...” ती हे का विचारतेय ते न कळून काहीस गोंधळून सुधाकर म्हणाले, “पण …ते…एवढे मोठे, सध्या नाही परवडणार...”

“त्यांच्याबरोबर अपॉईंटमेन्ट नक्की केलीये, तुम्ही फक्त सगळं व्यवस्थित समजून सांगा. हो, त्यांच्याबरोबर सगळा व्यवहार ठरलाय, झालाय, तुम्ही त्याचा विचार करू नका, केवळ केसचाच विचार करा…” तोवर आतून आजींचा थरथरता आवाज आला, “कोण आलंय?”

“मी शकुन, आजी,’ म्हणत ती आतल्या खोलीकडे वळली, नमस्कार करत म्हणाली, “कशी आहे तब्येत?”

“हं...बरीच बडी असामी झालीस म्हणे तू...खूप काय काय करते म्हणे...” वरपांगी कौतुक दाखवत म्हणाल्या.

“ते राहू द्या... मोठ्या डॉक्टरांना सांगितलय, तुमच्या तब्येतीसाठी ते येऊन तपासतील, त्यांना सर्व काही नीट, सविस्तर सांगायचं बरं… अगदी प्रत्येक बारीक सारीक गोष्टही...”

“कशाला हवेत मोठे डॉक्टर, आहे आपला कोप ऱ्यावरचा श्याम, तो करतो दवापाणी…”

“मोठ्या डॉक्टरांनी एकदा तपासण्या नि औषधं लिहून दिली कि रोजचं सर्व श्याम डॉक्टरच पाहतील. पपा,” मागोमाग आत आलेल्या सुधाकरकडे वळून ती म्हणाली, “तुमची तब्येतही खूपच खालावलीये, मला कल्पना नव्हती, मी तुमच्यासाठीही डॉक्टर कामतांची अपॉईंटमेन्ट घेते, आजीबरोबरच तुम्ही चेकअप

करूनच घ्या…" सुधाकर आढेवेढे घेऊ लागताच म्हणाली, "नाही कसं, तब्येत सांभाळली नाही तर केस कशी लढणार…?"

"मी विचारायला आलो, तुझं काही सामान कसं दिसत नाही? तू…"

"नाही, मला जायला हवं..." जरा कोरडेपणानं म्हणत शकुनने संध्याला हाताला धरून तिच्या खोलीकडे वळली... संध्या दिगमूढ होऊन लेकीकडे फक्त पहातच राहिली होती. आता ती एक यशस्वी तरुणी होती, तिला दुरावली होती, पण जेव्हा संध्याने तिला ती त्यांची दत्तक कन्या असल्याचं सांगितलं होतं तेव्हाच शकुन त्या सर्वांना, नि तिलाही दुरावली होती.

"कशी आहेस आई?" पलंगावर तिच्याशेजारी बसत शकुनने विचारले. सुधाकरने त्या दोघींना एकटं सोडलं.

"क…काय… किती मोठी झालीस, ...खूप अभिमान वाटतो तुझा..." संध्या काय बोलत होती, तिचं तिला समजत नव्हतं.

"अगं इतकं औपचारिक का बोलतेस? मी तुझीच लेक आहे, तुझी सोनू…" बोलता बोलता शकुनचा अलिप्तपणाचा मुखवटा विरघळून ती भावनाविवश झाली, "अग मी जे काही करते, जिथे कुठे जाते, जे काही मिळवते ते सारं काही तुझ्यामुळे... आणि म्हणूनच ते सर्व काही आहे ते तुझ्यामुळेच आणि तुझ्यासाठीच. खरं सांगू, सत्यपरिस्थिती समजली तेव्हा सर्वांतून मन उडालं होतं. मी कोण? कुणाची? माझं…माझं कुणीच नाही? एक उदासीनता पसरली. वाटायचं मी जगायचं कशासाठी, कुणासाठी?" संध्याने चमकून तिच्याकडे पाहात तिचा हात घट्ट धरला. शकुनने होकारार्थी मान डोलावली, "हो, आत्महत्येचे विचारही यायचे. आता वाटतं

किती वेडेपणा होता तो…पण तेव्हा खूप विफल वाटायचं. पण तुझ्याकडे पाहून विचार येई, तुझे सारे श्रम कसे वाया घालावायला निघाले होते? श्रम म्हणजे शारीरिकच नव्हे, ते तर काहीच नव्हते तू सोसलेल्या मानसिक ताणतणावांपुढे….मला सर्व नकारात्मतेपासून दूर ठेवण्यासाठी झटत राहिलीस. मला होणाऱ्या दुःखाचे व्रण तुझ्या मनावर उठत राहले, माझे दुःख तू सोशित राहिलीस. सर्व सोसून निग्रहाने मला देता येण्यासारखं सर्व काही मला देऊन तू वाढवलं नसतंस तर आज…आज न जाणो मी कुठे असते…” शकुनचा स्वर गदगदला.

मग क्षणभर थांबून एक खोल श्वास घेत, ती जे काही या कोलमडत्या घराला सावरण्यासाठी धावून येऊन करत होती आणि ज्यांच्यासाठी ती त्यांची कधीच कोणीच नव्हती त्या पपा आणि आजींसाठी ती जे काही करत होती त्याचा उल्लेखही न करता, भरल्या गळ्याने म्हणाली, “आणि… आणि आता मी जी इथे आले नं, ती देखील फक्त आणि फक्त तुझ्यासाठीच……”

.

# कशासाठी एवढा आटापिटा?

सरुताईंनी पडल्यापडल्याच डोळे किलकिले करून घड्याळाकडे पाहिले. हं, उठायलाच हवे, म्हणत त्या उठून बसल्या. आताश्या प्रत्येक कामासाठीच जरासा जास्त वेळ लागायचा … तरी तयारी करून निघेपर्यंत थोडा उशीर झालाच.

बाहेर भाई पुस्तक वाचत बसले होते. “निघालीस? जरा चहा केला असतास तर… त्या बाईचा काही बरा होत नाही,” ते जरा दबल्या सुरात म्हणाले. “अहो, आधीच उशीर झालाय, तो ड्रायव्हर येऊन थांबला असेल,” सरुताई जरा हैराण होऊन म्हणाल्या, “आधी सांगितलं असतत तर लवकर उठून केला असता. उद्यापासून करीन, आज नको, पोर वाट बघत असेल.”

ट्रॅफिकमुळे अजूनच वेळ लागला. पोहोचेपर्यंत शाळा सुटून भोवतीचे सर्व रस्ते भरून गेले होते, गाड्याही बऱ्याच होत्या. मग ड्रायव्हरने गाडी दूरच पार्क केली नि सरुताई उतरून शाळेपर्यंत गर्दीतून वाट काढत गेल्या. सात वर्षांचा मिंटू गेटजवळच उभा होता, पण विरूध्द दिशेला कुठेतरी एकटक पहात होता.

“अरे, आपली गाडी या दुसऱ्या टोकाला आहे, तिथे कुठे बघतोस, चल…” म्हणत त्यांनी मिंटूची स्कूलबॅग घेतली आणि सहजच त्यांची नजर तो जिथे बघत होता त्या दिशेला गेली. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूलाही मुलं-पालकांची गर्दी होतीच. पण त्यात ती पाठमोरी … फक्त मोकळे केस आणि खांद्यावरची ओढणीच दिसली. पुढच्याच क्षणी ती झपाट्याने गर्दीत नाहीशी झाली. ती … चंदना?

गोंधळलेल्या मनःस्थितीत त्या मिंटूचा हात धरून गाडीकडे परतल्या. गर्दीत नीट दिसलं नाही, पण मिंटूही तिथेच पहात होता. म्हणजे? रोजच येते? त्यांना यायला उशीर झाला तर – मिंटूला भेटते? ही नवी शंका मनात येताच त्या काहीश्या गडबडल्या. खरं काय ते कसं कळणार? मिंटूला विचारलं तर... पण त्याला उगाच दुविधा. एवढ्याश्या पोराला बाजू घ्यायला लावणं हीच आधी तणावाची गोष्ट ... संध्याकाळी विशाल घरी आल्यावरही त्या याबाबत काहीच बोलल्या नाहीत.

हे पुन्हा दुसऱ्यांदा संसार सुरू केल्यासारखं झालं, त्या मनात उसासल्या, पुन्हा मुलाच्या शाळा, अभ्यास, आजारदुखणी. पण बोलायला जागा नव्हती, लेकाच्या बरोबरीने उभे राहणे भाग होते. कोण बरोबर कोण चूक हा विचार करत बसण्यात अर्थ नव्हता. दोघांचं नाही पटलं, घेतला घटस्फोट. तशी धुसफुस दोघ्यांच्याही तर्फे होतीच, वेगळं दोघांनाही व्हायचच होतं. विशालच घटस्फोटाचा अर्ज दाखल करणार होता, पण त्याआधीच चंदनाने नोटीस पाठवली.

झालं! विशालचा पुरुषी अहंकार डिवचला गेला. चंदनाला धडा शिकवण्यासाठी त्याने मिंटूची कस्टडी मिळवण्यासाठी जंगजंग पछाडले.

त्याने आईवडिलांना त्यांचे उपनगरातले घर बंद करून आपल्या ऑफिसने दिलेल्या मोठ्या अपार्टमेंटमध्ये येऊन राहायला लावले. इतकेच नव्हे तर कोर्टात सरुताईंना हजर करून त्याने असेही पटवून दिले कि माझ्या घरात मुलाचा सांभाळ करायला, त्याला माया द्यायला मुलाचे आजीआजोबा चोवीस तास आहेत, ते अजूनही सक्रिय आहेत, त्यामुळे त्याची जराही आबाळ होणे शक्य नाही. चंदनाला नोकरीसाठी दिवसभर बाहेर  राहणे क्रमप्राप्तच होते. तिच्या घरचे सर्व अजूनही आपल्या संसारात गुंतलेले होते, आणि मिंटूला सांभाळायला तिच्याबरोबर येऊन

राहू शकत नव्हते. शेवटी विशालने कस्टडी जिंकली आणि मिंटू सरुताईंची जबाबदारी बनला.

कोर्टाने नेमून दिलेल्या दिवशी मिंटू नि चंदना भेटू शकत होते. पण नेमलेल्या दिवसाखेरीज मिंटूचा चंदनाशी जराही संपर्क येऊ नये याची विशाल खबरदारी घेत असे. सकाळी ऑफिसला जातांना तो स्वतः मिंटूला शाळेत सोडी नि दुपारी सरुताईंसाठी गाडी पाठवून देई. दुपारच्या उन्हाने भाईंच्या डोळ्यांना त्रास होई, त्यामुळे हे काम सरुताईंचेच.

पण आता ही चंदना मुलाला भेटायला रोज शाळेकडे येत होती की काय? तिचं ऑफिस त्याच्या शाळेच्या तसं जवळ होतं नि ऑफिसच्या वेळा आपल्या सोयीने निवडण्याची मुभा होती, म्हणजे लवकर येऊन लवकर निघणे वगैरे. नेमून दिलेल्या दिवशी तर मिंटू पूर्ण दिवस तिच्याबरोबर असे, तरीसुध्दा रोज येऊन --? अर्थात, एक दिवस मुलाला भेटून कुठल्या आईचं पोट भरेल? पण तिच्या अश्या या भेटण्याची गोष्ट उघडकीला आली तर गुंता अधिकच वाढण्याची शक्यता होती. आत्ता कुठे वादळ थोडसं शमलं होतं, तेवढ्यातच –

मग त्यांनी दुरून निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला. गाडी लांबच पार्क करायला लावत आणि गर्दीत मिसळून शाळेच्या गेटकडे पहात. हो, चंदना खरच त्याला येऊन भेटत होती. शाळेकडे येणाऱ्यांच्या गर्दीत त्या जवळपास कुठे नाहीत हे पाहून पट्कन येऊन त्याच्याशी बोलून पापा घेऊन पुन्हा लोकांमध्ये अदृश्य होई.

सरुताईंना प्रश्न पडला, आता काय करावं? विशालला कळलं तर? पण त्याला कळो न कळो, त्यांनी काय पाऊल उचलायला हवं?

त्यांनी मिंटूच्या मनाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. त्याला काय वाटत होतं? पण तो मम्मी किवा पप्पा यांच्या बाबत बोलतच नसे. एकदम मोठा झाल्यासारखा गप्प-गंभीर बनला होता. कोणाची बाजू घ्यायची नाही, आपल्याला खरं काय वाटतं ते बोलूनही दाखवायचं नाही. अकाली प्रौढ झाला होता तो. आई वरचेवर भेटते का किंवा ती भेटावी असं त्याला वाटतं का यावर तो अवाक्षरही बोलणार नाही याची त्यांना खात्री होती. मिंटू काहीही थांगपत्ता लागू देत नसे. लबाड, चांगलाच नाटकी झालाय! असा त्यांच्या मनात विचार आला आणि त्याच क्षणी त्यांच्या पोटात गलबलून आलं – त्याच्या आईवडिलांनी, त्यांच्यातल्या परिस्थितीने या एवढ्याश्या वयात केवढं ओझं टाकलं होतं त्याच्या इवल्या मनावर. या वयात त्याला समजून उमजून, खूप विचार करून, तोल राखून वागायला लागत होतं. त्या मुलावर हे विचारपूर्वक वागणं लादलं गेलं होतं.

सरुताई आता रोजच गाडी दूर पार्क करायला लावून शाळेपर्यंत जातांना मध्ये लोकांच्या गर्दीत रेंगाळू लागल्या. पण त्यांच्या मनात थोडी शंका येई की पाठी थांबलेल्या ड्रायव्हरच्या हे ध्यानात तर येणार नाही ना? कदाचित एखाद दिवशी तो स्वतःच, 'आजींना उशीर का झाला' म्हणून पहायला आला तर? त्या ड्रायव्हरला भीत होत्या असं नाही, पण त्याने जर चंदनाला पाहिले आणि काय होतं आहे ते जाणून आपल्या साहेबाकडे बोलला तर?

त्या गर्दीत मिसळून जायचा प्रयत्न करत, पण तरी चंदनाने त्यांना असं थबकत, वेळ काढत पुढे येतांना बघितले. ती अर्धवट हसली आणि निघून गेली. पण मग तिच्या ध्यानात आले कि तिच्या अश्या भेटण्यावर आक्षेप घेण्यऐवजी त्या मुद्दाम रेंगाळत उशीर करत होत्या. हे लक्षात आल्यावर तिने घाईगडबडीने निघून जाणे बंद

केले. त्या येईपर्यंत ती मिंटूशी बोलत उभी राही आणि त्या आल्यावर 'कशा आहात?' असं औपचारिक विचारून मगच जाई.

पण या विषयावर मागाहून कोणीही काही बोलत नसे. त्यांनी कधी मिंटूला विचारले नाही किंवा त्यानेही कधी मम्मीबद्दल एक शब्दही उच्चारला नाही. तो खुश होत होता का हेही कळायला मार्ग नव्हता.

पण या सर्वात त्या ड्रायव्हरमुळे सरुताईंना डोक्यावर एक टांगती तलवार असल्यासारखं वाटे. त्या त्याला टाळायचे मार्ग शोधू लागल्या. त्या लवकर तयार होऊन बसू लागल्या नि वेळ होताच, गाडी यायला उशीर झाला म्हणून टॅक्सी करून शाळेत जाऊ लागल्या. पण आजी निघून गेल्या म्हणताच तो ड्रायव्हर पाठोपाठ गाडी घेऊन शाळेत येई, आणि मग तर 'गाडी घेऊन आलोय' हे सांगायला त्यांना शोधत शाळेच्या गेटपर्यंत येई. म्हणजे हे तर उलटच होऊ लागले, तेव्हा सरुताईंना तो विचार सोडून द्यावा लागला.

कधी विशालला ऑफिसच्या मिटिंग्जसाठी कार घेऊन दुसरीकडे जावे लागे. हे तो आधीच त्यांना सांगून ठेवी म्हणजे मग त्या टॅक्सीने जात. अश्या निर्धास्त दिवशी मग त्या चंदनाला सरळ सरळ न सुचवता मिंटूला सांगत, "तुला मम्मीबरोबर कुठे जवळपास जायचं असेल तर जा, मी थांबते इथे..." त्याची बॅग घेऊन त्या शाळेबाहेरच्या बेंचवर बसून राहात. गाडी आणि ड्रायव्हर नसणं त्यांच्या पथ्यावर पडत होतं. ड्रायव्हरच्या असण्याने त्यांना स्वतःपेक्षा मिंटूची अधिक काळजी वाटे. जर का ड्रायव्हरने पाहिलं, तर मिंटू मनातल्या मनात घाबरत राहील की या अंकलनी आपल्या पप्पांना जाऊन सांगितलं तर काय होईल? आणि ते पोर कोणाकडे तोंड न उघडता आतल्या आत भिऊन राहील.

मग अचानक सरुताईंना काही आठवलं. अरेच्या, हे आधी का नाही सुचलं आपल्याला? जुनं घर बंद करून ठेवलं तेव्हाच त्यांची जुनी कारही तिथेच बंद करून ठेवली होती नि शेजारच्या मन्याला मधूनमधून चालू करत राहायल्या सांगितलं होतं. तीच कार इथे आणून पुन्हा वापरायची ...

“आई, आता हे काय नवीन काढलंस?” विशाल जरा त्राग्याने म्हणाला, “मी पाठवतो ना रोज कार नि ड्रायव्हर...”

“अरे, ते सगळं अनिश्चित राहातं ना,” सरुताईंनी समर्थन केलं, “तुझ्या ऑफिसकडून इथे येईपर्यंत ट्रॅफिकमध्ये अडकून बरेचदा त्याला उशीर होतो आणि मिंटू वाट पाहील म्हणून मला चिंता होते. पुन्हा तुलाही कितीदा मिटिंग्जना जायला लागतेच ना कार हाताशी. त्यापेक्षा माझी मीच जात जाईन. याच कारची सवय आहे मला, आत्ताआत्तापर्यंत तर जात होते…” खरंतर, ‘आत्ताआत्तापर्यंत’लाही पंधरा वर्षं होऊन गेलीहोती. मुलं शाळेत होती तोपर्यंत त्यांना शाळेत, क्लासेसना, इथतिथे घेऊन जायला त्या स्वतः ड्राइव्ह करत. पण एकदा मुलं मोठी झाल्यावर आधी थोरल्या विजेताने कारचा ताबा घेतला, मग तिचं लग्न झाल्यावर ती कार विशालची झाली. इतक्या वर्षांत सवय सुटली होती, तरी उसन्या अवसानाने त्यांनी घरच्यांना पटवून दिलं.

मग जुनी कार आणवून तिची डागडुजी झाली, सरुताईंनी आपल्या ड्रायव्हिंगला जरा उजाळा द्यायचा प्रयत्न केला. अर्थात या सगळ्या गोष्टी भाईंच्या निरिक्षणातून सुटणे शक्यच नव्हते. “का ग, ती तुझी सून येते का तिथे मिंटूच्या शाळेत?” भाईंनी अगदी सहजपणे विचारताच त्या दचकल्याच. पण बेफिकिरीने बोलावे तसे म्हणाल्या, “ती येऊन जात असेल तर मला ते कसं कळणार?” पण

भाईंना फसवणे तितकेसे सोपे नव्हते हे त्याही जाणत होत्या. निदान तेव्हा तरी ते जास्त काही बोलले नाहीत.

त्यानंतर सरुताई स्वतः आपली कार घेऊन जाऊ लागल्या. मिंटूला सांगून ठेवले कि हवं तर मम्मीबरोबर इथेतिथे जाऊन येत जा पण जास्त वेळ लावत जाऊ नकोस. या गोष्टी चंदनाला न सांगता त्या मिंटूशीच बोलत. पण कुठे गेला, काय केलं, हे कधी त्याला विचारलं नाही. शाळेजवळ एक मोठा मॉल होता नि एक पार्कही, तेव्हा जायला जागा होत्या.

ड्रायव्हिंग सोडून बरीच वर्षे झाली होती. आता त्यांचं वयही वाढलं होतं आणि ट्रॅफिकही. त्यामुळे ही ॲडव्हेंचर्स' जरा मुश्किलच होत होती. तरी त्या स्वतःहून याची कबूली देत नसत. पण एका संध्याकाळी मिंटू शाळेतून आल्याआल्या त्या बाजूला नाहीत पाहून आजोबांच्या कानाला लागला, “आज नं आजीने कार आपटली – ठोकली. फूटपाथच्या खांबावर... पण कुणाला लागलं नाही…”

यावर मात्र भाईंनी ताबडतोब ॲक्शन घेतली. “ते काही नाही. या वयात हे ड्रायव्हिंगचे उपद्व्याप करायची काही गरज नाहीए.” भाईंचं फर्मान सरुताईंनी आज्ञाधारकपणे मानलं. त्या आज्ञाधारक पत्नी होत्या म्हणून नाही, तर त्या स्वतःही त्या छोट्याश्या अपघाताने हबकल्या होत्या, म्हणून. खरंतर त्या अस्ताव्यस्त वाढलेल्या ट्रॅफिकमधून कार चालवायची या विचारानेच त्या रोज घामाघूम होत असत. तेव्हा हा शोधलेला उपायही बारगळला.

पण आता पुन्हा एकदा ड्रायव्हरबरोबर जायला-यायला त्या तयार नव्हत्या. आता मिंटूलाही मम्मीसोबत निदान अर्धातास तरी फिरण्याची सवय झाली होती. तो

अजूनही काही बोलत नव्हता ना मम्मीबरोबर जाण्याची मागणी करत होता. पण सरुताईंनी विशालला सांगितले, “ते तुझी कार उलटसुलट पाठवण्याचे काम नको. मी टॅक्सीने येत जात जाईन.” विशालसाठी पैशाचा कधी प्रॉब्लेम नव्हता, त्यामुळे मग असा नित्यक्रम बनला.

पहिल्यापेक्षा परतायला उशीर होतो, हे कुणाच्या नजरेत येऊ नये म्हणून त्या मिंटूला विचारत कि दुसऱ्या दिवसासाठी शाळेत क्राफ्टचे, किंवा काही आणायला सांगितले आहे का? मग ते मायलेक फिरून येईपर्यंत त्या सगळ्या गोष्टी खरेदी करून ठेवत, म्हणजे घरी सांगायला की हे सगळं घेण्यात उशीर झाला. अर्थात याने भाई फसणे शक्य नव्हते.

एकदा भाईंनी सरळच विचारलं, “का एवढं जीवाचं रान करतेस? त्या -- त्या सुनेला तिच्या लेकाला भेटू देण्यासाठी?”

“सून आणि नातू असा विचार मी करत नाही. मी फक्त आई-मुलाबाबत विचार करते…”

“अगं, पण एवढं जर का होतं तिला मुलाचं प्रेम, तर मग गेलीच कशाला डायव्होर्स घ्यायला? स्वतःच आधी नोटीस पाठवण्याची मोठी खुमखुमी होती ना तिला, मग आता राहा म्हणावं मुलाशिवाय. कशाला येते रोज भेटायला?”

“मुलाचे बाप शोभलात बरं,” सरुताई खेदाने म्हणाल्या, “तिने प्रथम अर्ज केला म्हणून तिची जिरवलीच पाहिजे, नाही का? विशाल काही तिच्या मनधरण्या नक्कीच करत नव्हता, तो स्वतःच देणार होता ना घटस्फोट? बाईने आपल्या मर्यादेत राहून नवरा डायव्होर्स देईपर्यंत वाट पाहायला हवी, नाही का? नाहीतर मग तिला अशी अद्दल घडवली जाते…”

“म्हणजे? आता तू तिची बाजू घेऊन माझ्याशीही भांडणार की काय….?”

“मी ना सुनेची बाजू घेते ना मुलाची… मी फक्त ही गोष्ट नजरेस आणून दिली.” सरुताईंनी एक खोल श्वास घेतला, “मी जे काही करतेय ते मिंटूसाठी. त्याचा कुणी विचार केला? या अहंकारांच्या होळीत त्याचा बळी का दिला जावा? पोरगं काहीच बोलत नाही, म्हणून आपणही डोळे मिटून घ्यायचे? विशालने त्याला एवढ्या अट्टाहासाने आपल्याकडे खेचून घेतलं, तर मला वाटलं हा पोराला बापाची नि आईचीही माया देईल. पण स्वतःची जीत झाल्यावर मुलाबद्दल सगळं विसरून गेला. मुलाला माया हवी, त्याला वेळ द्यायला हवा… देतो हा? मिंटूला विचारलं तर, सकाळी शाळेत सोबत जातांनाही पप्पा लॅपटॉप वा फोनवर बिझी असतो म्हणे. विशालचा संबंध नुसता ‘कुणी भेटलं नाही ना?’ एवढंच पोराला रोज दरडावून विचारण्यापुरता. बाकी सतत आपलं काम, पार्ट्या, आणि हो … नवीन जोडीदारीणीचा शोध! मुलगा आपला म्हणून त्याच्या चुकांकडे डोळेझाक करायची आणि सगळा गुन्हा सुनेचाच असं म्हणायचं? का, तर ती आपली कोणी नाही म्हणून?”

“आपण दोघे आपल्याच विवंचनेत – आज काय गुडघे दुखताहेत, तर उद्या कंबरच धरली. आपण सांगून सांगणार काय तर राजाराणीच्या गोष्टी. त्याला नव्या गोष्टी, त्यांचे नवीन युगाचे काय ते व्हिडियो गेम्स खेळायला कोण आहे? त्याच्या आवडीच्या गोष्टी त्याच्यासवे करायला कोण आहे? तेवढा अर्धा तास का होईना, पण पोराला आई भेटावी, जरा तरी माया मिळावी, म्हणून हा आटापिटा हो….” त्या उठून शाळेला जायची तयारी करू लागल्या.

# वंशपरंपरागत ठेवा

दरवाजा किंचित किलकिला होता. आशा आपल्याच नादात, ठणकणारं डोकं चोळत आत आली. अलिकडे ही डोकेदुखी अगदी दररोजची गोष्ट झाली होती. बाहेरच्या खोलीत कोणीच नव्हतं, आत जाऊन पाहिलं तर आतल्या दृश्याने तिचं डोक्याचं दुखणं शिगेला पोहोचलं.

आतमध्ये तिची आई पलंगाच्या बाजूला बसली होती, पुढ्यात जुनी ट्रंक उघडी पडली होती आणि तिची आई त्यातील एकेक वस्तू काढून आपल्या पदराने अगोदरच स्वच्छ असलेल्या गोष्टी पुन्हा पुन्हा पुसून ठेवत होती. मध्येच थांबून हातातील वस्तूकडे तंद्रीत एकटक पाहात होती.... एक तुटलेला चष्मा, जुनं नकाशांचं आणि सांकेतिक शब्दांचं पुस्तक, एक गावठी पिस्तूल, एक पोलिसांची शिट्टी, काही जुने कपडे आणि असंच काहीबाही.

“काय करत्येस आई?” आशाने थोडं जोरातच विचारलं, आई जरा दचकलीच. “काही नाही ग. जरा साफ करत्येय…या इतक्या महत्त्वाच्या वस्तू....” आई कुठेतरी हरवल्यासारखी हसली.

“तू निव्वळ तेवढंच करत्येस, दुसरं काही नाही,” आशा चिडक्या स्वरातच म्हणाली.

"का नाही? किती मूल्यवान आहेत, ठाऊक आहे? माझ्या वडिलांच्या वैयक्तिक गोष्टी, ज्या त्यांनी स्वातंत्र्य-लढ्यात वापरल्या होत्या..." आईच्या शब्दाशब्दांतून अभिमान ओसंडत होता.

"माहीत्येय," आशाच्या आवाजात कडवटपणा होता, "तू तर नेहमी असं बोलतेस जणू या वस्तू स्वतः गांधीजींच्या होत्या...."

"का? गांधीजींनी एकट्यानेच लढा दिला का?" आईने उसळून विचारले. आताची ही स्त्री आधीच्या घाबरट, चाचरणाऱ्या बाईहून अगदी वेगळी होती, "ठीक आहे, ते होते महात्मा, पण त्यांनी एकट्यानेच स्वातंत्र्य मिळवलं का? मग त्या हजारो स्वातंत्र्य सैनिकांचं काय? त्यांचं योगदान महत्त्वाचं नाही? माझे वडीलही सक्रिय कार्यकर्ता होते. या…या पिस्तूलाने त्यांनी एका गोऱ्यावर गोळी झाडली होती...."

"मला तो सर्व इतिहास पाठ आहे, आई," आशा कंटाळलेल्या आवाजात उद्गारली, "तू भुतकाळातच स्वतःला कैद करून त्यातच रमतेस. आता, वर्तमानात काय होतय याची तुला कधी पर्वाच नसते..."

"का? काय झालं?" आई पुन्हा एकदा घाबरट अनशुअर बाई झाली, "काही प्रॉब्लेम आहे का?"

"नाही ग बाई, काही प्रॉब्लेम नाही. सगळं कसं मस्त आहे. तू शांतपणे तुझ्या रम्य भूतकाळात परत जा हं," आशा कडवट उपरोधाने म्हणाली. पण मग आईच्या बावरलेल्या अपराधी चेहऱ्याकडे पाहून तिलाच वाईट वाटले. "तुला माहित्येय, अप्पांनी माझ्यासाठी एक नवी नोकरी शोधली आहे. आणि म्हणतात की मी ही नोकरी सोडून द्यावी...."

“हो हो...हे मला माहित्येय...” आईचा चेहरा जरा उजळला, तिला अगदीच काही माहीत नव्हत असं नाही, “मग त्यात काय वाईट आहे? तिथे पगार चांगला आहे म्हणे....”

“अगं, चांगल्या पगारासाठी चांगली पात्रता, गुणवत्ता असलेली माणसं लागतात, माझ्यासारखी नाही...” आशाने समजावले, “त्यांना कुणी योग्य उमेदवार मिळताच मला काढून टाकतील काही महिन्यातच. मग मी पुन्हा रस्त्यावर, कामाच्या शोधात. आज मी बोलले आमच्या सरांशी. बिच्चारे दादासाहेब. त्यांना खरचं वाईट वाटलं. ते जास्त पगार देऊ शकत नाहीत, पण हे काम जवळ, सोयीचं आणि स्थिर आहे, याची त्यांनी आठवण करून दिली. आई, मला खरचं हे काम नाही सोडायचंय....”

पण त्या दोघींनाही हे पक्क माहीत होतं की एकदा तिच्या अप्पांनी काही ठरवलं की ते त्यांना करावंच लागे. आशाने तिच्या आईचा मूक शहारा पाहिला आणि तिचे ओठ दुमडले. त्यांच्या पाठीमागे शहारून आणि उसासून काय फायदा? पूर्ण आयुष्यभरात तर तिने कधी त्यांच्या जुलुमांना विरोध करण्याचा प्रयत्नही नाही केला. कणखर स्वातंत्र्यसैनिकाची मुलगी म्हणवून घेण्यात काय अर्थ, जर घरातल्या जुलमांनाही विरोध करता येत नसेल तर? कदाचित त्या बिनविरोध शरणागतीमुळे अप्पांचं चांगलच फावलं.

तिची आई कारण होती का अप्पांच्या दादागिरीच्या, जबरदस्तीच्या वागण्याला? तीच जबाबदार होती ...ते जे काही असेल ते असेल, पण त्यांच्या कुटुंबाची मात्र अवदशा झाली होती. प्रत्येक प्रकारचे वाईट व्यसन असलेला तो

बिनकामाचा माणूस त्यांच्यावर केवळ सत्ताच गाजवत नव्हता, तर त्यांच्या कमाईवर आरामात जगत होता.

राहून राहून आशाला आईच यासाठी जबाबदार वाटत होती. त्या बाईने कधीही आपल्या साध्या बचावासाठीही एकही शब्द काढलेला आशाला आठवत नव्हता. त्यांच्याशी भांडणं, किंवा त्यांच्या अत्याचारांविरूध्द लढणं तर दूरच. अप्पा स्वतः कधी पैसे कमावण्यासाठी कष्ट करत नसत, किंवा केलेच तर कमावलेले पैसे कधी घरापर्यंत पोहोचत नसत. मग आईलाच दोन मुलं सांभाळून घरही चालवावं लागे. अशिक्षित, काही कला अंगी नसलेली बाई कुणाचा स्वयंपाक करून देई तर कुणाच्या घराची सफाई करी, किंवा कपडे शिवणं, पापड लोणची करुन विकणं हे करी. स्वतःची कमाई नवऱ्याने दमदाटी करून मागितल्यावर त्याच्या हवाली करी आणि त्या पैशाने तो पिऊन घरी आल्यावर त्याचा मारही खाई.

आशाला तर अचंबा वाटे कि कोणीही स्त्री इतकी बिनकण्याची, इतक असहाय्य कशी असू शकते. वयात येत असतांना आशाने तिच्या आईचा धीर वाढवण्याचा, तिच्या पाठीशी उभं राहून तिला बळ देण्याचा खूप प्रयत्न केला. पण स्वतःचं रक्षण करण्याइतकंही सामर्थ्य ती कधी एकवटू शकली नाही.

पण कधीकधी काही गोष्टी तिच्या बधिरलेल्या मनापर्यंत पोहोचत असाव्यात असे वाटे. जसे, जेव्हा आशाचा भाऊ अप्पांच्या जुलुमांना कंटाळून भांडून घर सोडून गेला, तेव्हा आशाने हिंमत दिल्यावर आईने बोलण्याचा धीर केला, परिणामान्ती दोघींनाही बेदम मार खावा लागला. आणि त्याबरोबरच कुठल्याही बंडाचे विचारही तिथेच विरून गेले. आशा तेव्हा शाळेतच होती, तरी तिने भावाला शोधायचा होईल तितका प्रयत्न केला. आईचा आपल्या मुलावर किती जीव होता

हे आशाला ठाऊक होतं, मग ती अशी 'माझं दुर्दैवी नशीब' असं म्हणून सगळं सहन कशी करू शकत होती?

आत्ताच्या तिच्या व्यस्त आयुष्यातही आशाला कित्येकदा भावाची आठवण यायची. पण आईने कधी असं जाणवूही नाही दिलं की ती आपल्या मुलासाठी आतल्याआत झुरत होती. तिच्या आयुष्यातील या सर्व खाचखळग्यांमध्ये ती जुनी ट्रंक आणि त्यातील वस्तू हेच काय ते तिच्यासाठी एक शांतीची, विसाव्याची जागा होती. त्या ट्रंकेपुढे बसून त्यातील एक एक वस्तू हाताळत राहाणं हाच तिच्या मनाला विरंगुळा होता. जरा बऱ्या मूडमध्ये असली की जो कुणी ऐकेल त्याला त्या प्रत्येक गोष्टीमागील कहाणी ऐकवत राही. त्यांच्या घरी कधी चुकून माकून आलेल्या पाहूण्यांना न चुकता पूर्ण इतिहास ऐकवी, पण केवळ अप्पांच्या अनुपस्थितीतच. कारण अप्पा घरी असतांना त्यांचा आरडाओरडा, शिव्यागाळ आणि मारहाण याव्यतिरिक्त अजून कशासाठी वेळ असणे शक्यच नव्हते. त्यामुळे आशाला कितीही चीड आली तरी आईला तिच्या त्या ट्रंकेवरून रागावण्याने तिला मनोमन वाईटच वाटले.

भाई होता तोवर अप्पांनी आशावर कधी हात उगारला नव्हता. त्याच्या घर सोडून जाण्यानंतर जेव्हा तिने आपल्या कोंडलेल्या भावनांना मुक्त वाट करून दिली तेव्हाच पहिल्यांदा अप्पांचा बेदम मार खाल्ला. आणि त्यानंतर आईबरोबर, जरी आईइतका नाही तरी, तिलाही मार मिळतच राहिला.

घरच्या या अश्या वातावरणामुळे वसंतच्या मिळालेल्या सोबतीसाठी ती देवाचे आभारच मानी. तो तिला केव्हा आणि कसा भेटला याची तिला नीट आठवणही नव्हती. पण जेव्हा सगळ्या परिस्थितीची त्याला जाणीव झाली

तेव्हापासून तो खंबीरपणे तिच्या पाठीशी उभा राहिला होता. खरतर तो शिकला-सवरलेला होता,छोट्या कंपनीत मेडीकल रिप्रझेंटेटिव्ह होता. त्याला तिच्यासारख्या एसएससी झालेल्या टायपिस्टपेक्षा बरीच चांगली मुलगी केव्हाही मिळू शकली असती. बऱ्याचदा हा विचार तिच्या मनात येई आणि तिने त्याला तसे बोलूनही दाखविले, पण तो नेहमीच तिचे असे कमीपणाचे बोलणे-वागणे बाजूला झटकून टाकी.

तसं तर आशाला दुसऱ्याही बाबतीत अपराधी वाटे. बिचाऱ्या आईला एकटीला अप्पांच्या दुष्ट वागण्याचा बळी करून तिने आपला सुखाचा संसार थाटणे हे स्वार्थीपणाचे नाही का ठरणार? नाही, ती असा विचारही करू शकत नव्हती. आणि तरीही, आशाने जेव्हा हळूच आईला वसंतबद्दल सांगितले --- अप्पांपुढे विषयही काढण्याचा प्रश्नच नव्हता--- तेव्हा आईनेच तिला उलट समजावले.

“आपण दोघीही या नरकात एकत्र सडण्याने काय मिळणार आहे? तू इथे असल्याने माझी काही शिव्यागाळ, मारहाणीतून सुटका होणार नाहीये, ना तुझ्या नसण्याने त्यात काही वाढ होणार आहे. निदान तू तरी वाचशील. आणि जर तुझं लग्न झालं तर निदान कधीमधीतरी मला डोकं लपवायला सुरक्षित आसरा मिळेल...”

हो, खरंच की, आशाने असा विचार कधी केलाच नव्हता. अप्पांपासून दूर राहून तिला आईची खूपच मदत करता येणं शक्य होतं. पण या सगळ्या दूरच्या गोष्टी होत्या, कारण अप्पा तिला कधीच जाऊ देणार नाहीत याची तिला खात्री होती. आता तर ती कमावती होती, आणि तिच्यावरच जवळजवळ सारं घर, आणि मुख्यतः त्यांची व्यसनं, चालत होती. अशी सोन्याची अंडी देणारी कोंबडी ते जाऊ देतील हे

शक्य नव्हते. त्यांच्या पुढच्या योजनांचा पुरावा त्यांनी आता दिलाच होता. तिच्या लग्नासाठी चांगलं स्थळ शोधण्याऐवजी त्यांनी तिच्यासाठी चांगल्या पगाराची दुसरी नोकरी शोधली होती...आशाच्या नाराजीची पर्वा न करता. तिला आवडो वा न आवडो, तिला आत्ताची तिची सुखाची नोकरी सोडून अप्पांच्या पसंतीची नोकरी करावीच लागणार.

पहिल्या दिवसापासूनच आशाला तिच्या नव्या कामाच्या जागेचं खोट्या दिखाव्याचं वातावरण काही फारसं रुचलं नव्हतं, काहीतरी चुकीचं वाटत होतं. पण मग तिने स्वतःलाच दटावलं, तिने स्वतःच आधी मनाचा पूर्वग्रह करून घेतला होता, नि त्यामुळे तिथलं काही बरोबर वाटतं नव्हतं. पण लवकरच सगळं स्पष्ट झालं. तिच्या मनातील उरलीसुरली शंका दूर करण्यात तिच्या वरिष्ठांनी तिची मदत केली. त्या चांगल्या पगारासाठी शॉर्टहँड-टायपिंगखेरीज इतर बऱ्याच गोष्टींची तिच्याकडून अपेक्षा होती.

आशाला धक्काच बसला, पण तरीही ती आपल्यापरीने दृढ राहिली. पण तिला कल्पना होती, या अश्या वातावरणात ती स्वतःला कितीकाळ सुरक्षित ठेवू शकणार होती? घरी तिने ही अशी नोकरी न करण्याचा आपला निर्णय जाहीर केला... आणि त्याबदल्यात अप्पांचा मारही खाल्ला. पण यावेळी तिचा निश्चय पक्का होता, त्यांच्या कितीही मारहाणीने बदलणार नव्हता.

हे सगळं कळल्यावर वसंतनेही ठरवलं कि आता फार झालं, आणि एक दिवस आपल्या काका आणि वडिलांबरोबर तो तिच्या दारात येऊन ठेपला. आईची कितीही इच्छा असली तरी आप्पा घरात असतांना बाहेर येऊन पाहुण्यांशी बोलणं शक्य नव्हतं. पण आपल्या मुलीला चांगलं घर, माणसं मिळालेली पाहून ती बरीच

खूश दिसत होती. पण हे तेव्हाच शक्य होतं जर अप्पांच्या विरोधाचा भलामोठ्ठा धोंडा पार करता आला तर.... आणि ते सहजासहजी मान्य करतील हे तर शक्यच नव्हते.

अप्पांनी त्यांचा विरोध अगदी भरपूर शब्दात व्यक्त केला ... त्यातील काही शब्द पाहुण्यांच्या नेहमीच्या संभाषणातील किंवा रूचणारे नसावेत हे त्यांच्या चेहऱ्यांवरून स्पष्ट होत होते. "कोणी सांगितलं तुम्हाला कि मला माझ्या मुलीचं लग्न करायचय म्हणून?" अप्पांनी तर मुळावरच घाव घातला, "तुम्हाला कोणी निमंत्रण धाडलं होतं का इथे आपलं स्थळ घेऊन या म्हणून? आता तुमचे लग्नाचे बेत घेऊन दुसरीकडे जायचं बघा... आमच्या इथे अपरिचितांना स्थान नाही......"

वसंतने त्यांच्याबद्दल सर्व काही ऐकलेले असल्यामुळे तो काही फारसा बिचकला नाही. "पण सर, मी तुमच्या मुलीसाठी अपरिचित नाही. आम्ही दोघांनी लग्न करायचं ठरवलंय नि माझ्या घरच्यांनी मान्यता दिली आहे. तेव्हा आता फक्त तुमचे आशिर्वाद मिळाले तर...."

"पण माझ्या मुलीने कधी सांगितले नाही कि तिला लग्न करायचंय..." अप्पा गरजले, त्यांना पूर्ण आत्मविश्वास होता कि आशा त्यांच्या पुढ्यात एक शब्दही उच्चारणार नाही. पण आशाने आपला सर्व धीर एकवटला, त्या नोकरीवर जावं लागू नये यासाठी ती आता काहीही करायला तयार होती. आणि ही तर लग्नाची गोष्ट होती, वसंतशी लग्न करण्यासाठी तिला हिम्मत दाखवायलाच हवी. "होय अप्पा, तो जे म्हणतोय ते खरं आहे. तुम्ही शोधलेली ती नोकरी अतिशय वाईट आहे. ती सोडून मी संसार थाटणार आहे वसं......"

"निर्लज्ज मुलगी!' अप्पांचा आवाज वर चढला, "बाहेर येऊन परक्या लोकांसमोर तोंड उघडायला लाज नाही वाटत? वर आणि स्वतःच्याच लग्नाच्या

गोष्टी करतेस? ते काही नाही, लग्नासाठी लहान आहेस अजून, तू तुझी सध्याची नोकरीच चालू ठेव....”

“नाही!” आशाही इरेस पेटून म्हणाली, “मी त्या ऑफिसात पुन्हा जाणार नाही!”

“सर तिला तिथे बरोबर वाटत नाही आणि ती जागा नाहीये चांगली. तिला जर नसेल जायचं तर तुम्ही तशी जबरदस्ती करू नये, नाही का....” वसंतने समजावायचा प्रयत्न केला. पण त्याला मध्येच तोडत अप्पा आपल्या मोठ्या आवाजात ओरडले, “तुम्ही गप्प राहा. मी माझ्या कुटुंबात काय करायचं हे इथे येऊन मला शिकवणारे तुम्ही कोण? ती माझी मुलगी आहे, मी ठरवीन तिने काय करायचं ते...” कधीही उलट ऐकून घेण्याची सवय नसलेले अप्पा या चौफेर विरोधाच्या माऱ्याने रागाने लालबुंद झाले होते.

“नाही अप्पा, या बाबतीत मी तुमचं ऐकणार नाही.” आशाही ठामपणे म्हणाली.

“मी पाहातो तू कशी ऐकत नाहीस ते!” अप्पा फिस्कारले, “लग्नबिग्न काही नाही, तीच नोकरी करायची.”

“नाही करणार,” आशाने पूर्ण विरोध करत त्यांचे बोलणे धुडकावून लावले, “काय कराल? खेचत न्याल मला त्या ऑफिसात?”

“तुला काय वाटलं?” अप्पांनी डोळे बारीक करत धारदार स्वरात विचारलं, “मी चूप बसेन? तू नाही ऐकलंस, तर ...इथे घरातच उघडेन ऑफिस...”

"अप्पा!" आशा किंचाळलीच. "अहो! हे काय बोलता आहात तुम्ही, समजतंय तरी का तुम्हाला! कसे वडील आहात?" वसंत अविश्वासाने उद्गारला. त्याचे वडिलधारेही गप्प राहू शकले नाहीत. अप्पा तर रागाने चवताळून उठले. आशाला ही सर्व लक्षणे चांगलीच ठाऊक होती. त्यांचा ताबा सुटला कि आता कुणावर हात किंवा बेल्ट उठेल याची काही खात्री नव्हती, अगदी वसंत नि पाहुणेही त्या तडाख्यात सापडण्याची शक्यता होती. अरे देवा!

डोळ्याच्या कोपऱ्यातून तिने आईला हळूच सरकत आत जातांना पाहिले … कधीच परिस्थितीला सामोरे जायचं नाही, नेहमीच निसटून पळण्याचा प्रयत्न… पण ते आता महत्त्वाचं नव्हतं. ती पाहुण्यांकडे वळली, "वसंत, तुम्ही सर्व प्लीज निघा इथून," तिने हात जोडून विनंती केली.

"का? राहू दे त्यांना. कळू दे त्यांना माझा विरोध करण्याचा हिसका…" अप्पा त्यांच्यावर धावूनच गेले, "माझ्या मुलीशी लग्न करायला आलेत? मी ठरवीन तिचं काय करायचं ते. लिलाव करीन तिचा नाहीतर विकून टाकीन सर्वात जास्त किंमत मोजणाऱ्याला..." आता त्यांनी सर्वच लाजलज्जा सोडून दिली होती.

"छी छी! काय हे!" खोलीत शरमेचे उद्गार उठले. पण तेव्हाच त्या खोलीत अजूनही काही घडले.आशाला जाणवलं की पाहुण्यांच्या विस्फारलेल्या नजरा तिच्या पाठीमागे कशावरतरी खिळल्या होत्या. ती किल्ली दिलेल्या बाहुलीगत यांत्रिकपणे मागे वळली.

हे तर काहीच्या बाहीच...पांढऱ्याफटक चेहऱ्याने आई तिथे उभी होती...दोन्ही हातात ते ते गावठी पिस्तूल धरून! हा काही भेसूर विनोद तर नव्हता ना! तिला हसावं का रडावं ते कळेना. तिच्या आईला खरचं असं वाटलं का ती

तिच्या या भयंकर, पिशाच्ची नवऱ्याला त्या त्या... जुनाट, मोडक्या पिस्तूलाने घाबरवू शकेल? ते निव्वळ हसले असते.

फट्! फट्!....हे काय? आशाला सर्वकाही चित्रपटाच्या स्लोमोशनमध्ये झाल्यासारखे वाटले. पूर्णपणे तिच्या लक्षात येण्याआधी अप्पा धाड्कन खाली कोसळले. एक गोळी त्यांच्या खांद्याला चाटून गेली तर दूसरी पायाला लागली होती. जखमेपेक्षाही, आपली शेळीसारखी गरीब बायको आपल्यावर पिस्तूल झाडू शकते या धक्क्यानेच ते जास्त कोलमडले होते.

सारे अवाक् होऊन पाहात असतांनाच अप्पा त्यातून स्वतःला सावरून उठायची धडपड करू लागले.

“हाह!” सगळे त्या आवाजाने दचकलेच. आई?? तिच्या अशक्त दुबळया आईच्या तोंडून असा स्वर? पण विचार करायला वेळ न देता, आई घाईने ओरडलीच, “पळ मुली पळ! मुक्त हो या पाशवी बंधनातून!” दोन्ही हातात घट्ट धरून ते पिस्तूल अप्पांच्या दिशेने नाचवत ती घोगऱ्या आवाजात बोलली, “मी म्हणाले नव्हते तुला, हे स्वातंत्र्याचं हत्यार आहे! आता उभी राहू नकोस. जा तुझ्या नवीन परिवारासोबत. माझी चिंता नको करूस. हा माणूस उठून उभा राहायच्या आत जा.”

.

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष.

# सविता शेट्टी यांचे हे दुसरे पुस्तक.

सविता शेट्टी यांच्या कथा मानवी जीवनातील आणि वीशेषतः आई आणि मूल यांच्या संबंधांतील नाजूक गुंतागुंत अधोरेखित करणाऱ्या असतात. प्रत्येक आईची कथा वेगळी असते. जगातील कोट्यवधी आयांची मने मात्र एकसारखी असतात. त्यामुळे सविताजींच्या कथा या वाचकाच्या मनाला भिडतात. त्यातले नाट्य त्या यशस्वीपणे रंगवतात. आणि त्यातले मातृहृदयाला भिडणारे काव्य प्रत्येक वाचकाच्या मनापर्यंत पोहोचते.

सविताजींसारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(११), डॉ. नितीन मोरे (४४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी

धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (६), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (७) सविता शेट्टी (२)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।